# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक ७५-२२** **दिनांक - ०७/०३/२०२२**

## ६ वर्षाच्या मुलीचे अपहरण करुन पश्चिम बंगाल येथे पळुन जाणाऱ्या आरोपीतास व अपह्रीत मुलीस २४ तासाच्या आत ताब्यात घेवुन गुन्हा उघड करण्यास वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.

दिनांक ०५/०३/२०२२ रोजी रात्री फिर्यादी (अपह्रीतेची आई) यांनी वालीव पोलीस ठाण्यात येवुन खबर दिली की, फिर्यादीची मुलगी वय-०६ वर्षे ही दिनांक ०४/०३/२०२२ रोजी रात्री ०९:०० वा.चे सुमारास आस्था वेल्फअर सोसायटी, वाकीपाडा, नायगाव पुर्व येथे बाहेर खेळण्यास गेली असता तीचे अज्ञानाचा फायदा घेवुन फिर्यादीची ०६ वर्षाची मुलगी हीस चॉकलेटचे अमिष दाखवुन अनोळखी इसमाने अपहरण केले बाबत वालीव पोलीस ठाण्यात फिर्याद दिले वरुन गु.नों.क्र. २५३/२०२२ कलम ३६३ भा.दं.वि.स अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन वरिष्ठांनी लागलीच ०३ शोध पथके तयार केले. गुप्तबातमीदार, आजुबाजुचे परिसरातील लोक तसेच नातेवाईक इत्यादी कडे अपहरीत मुलीचा ठाव-ठिकाणा बाबत माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता कोणतेही यश आले नाही.

तपासा दरम्यान फिर्यादी राहत असलेल्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज माध्यामातुन अनोळखी इसम वय-२० ते २५ वर्षे, हा सदर अपह्रीत मुलीस घेवुन जात असताना सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसल्याने वेगवेगळ्या ठिकाणेचे तसेच रेल्वे स्टेशन परिसरातील सीसीटीव्ही फुटेज चेक करुन सदर अनोळखी इसम हा अपह्रीत मुलीस मालाड मुंबई येथे घेवुन गेला असे निष्पन्न झाल्याने मालाड मुंबई परिसरात अपह्रीत मुलीचा व अनोळखी आरोपीताचा शोध घेत असताना आरोपीतास पोलीस हे आपल्या मागावर असल्या बाबत संशय आल्याने आरोपीत यांने अपह्रीत मुलीस मालाड येथे सोडुन आरोपीत हा पश्चिम बंगाल येथे पळुन जात असताना बांद्रा रेल्वे स्टेशन येथुन ताब्यात घेण्यात आले.

वरील कामगीरी श्री. संजयकुमार पाटील पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-२ वसई, श्री. पंकज शिरसाट सहाय्यक पोलीस आयुक्त, तुंळीज विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.राहुलकुमार पाटील, सपोनि/ज्ञानेश फडतरे,सपोनि/रमेश धायगुडे, पोउनिरी/प्रशांत चव्हाण, पोहवा/मुकेश पवार, मनोज मोरे, पोना/सचिन दोरकर, किरण म्हात्रे, राजेंद्र फड, पोना/शिवाजी पालवे, पो.अंम./गजानन गरीबे सुर्यकांत मुंढे, सचिन खताळ, जयवंत खंडवी, महेश चौगुले यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.

-------------oo----------------